# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

प्रेसनोट

## नवी दिल्ली येथे पार पडलेल्या ६४ व्या वार्षिक ए.एस.आर.टी.यु. च्या परिषदेमध्ये पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. ला वाहतूक नियोजन विभागाच्या श्रेणीमध्ये "पीएमपीएमएल डिझाईन स्टुडिओ" या नवीन संकल्पनेसाठी पुरस्कार प्राप्त

असोसिएशन ऑफ स्टेट रोड ट्रान्सपोर्ट अंडरटेकिंग्ज (ए.एस.आर.टी.यु.) च्या ६४ व्या वार्षिक परिषदेमध्ये पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. ने "पीएमपीएमएल डिझाईन स्टुडिओ" ही नाविन्यपूर्ण संकल्पना पीएमपीएमएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. संजय कोलते यांचे मार्गदर्शनाखाली वाहतूक नियोजन विभागाने ए.एस.आर.टी.यु. कडे मांडली होती. ए.एस.आर.टी.यु. या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेने सभासद असलेल्या वाहतूक संस्थांकडून विविध श्रेणीमध्ये उत्तम कार्यप्रणाली, नाविन्यपूर्ण संकल्पना या बाबींसाठी नामांकने मागविली होती.

पुणे शहरातील आर्किटेक्ट तथा सर्ग स्टुडिओचे संचालक श्री. योगेश दांडेकर यांचे कल्पनेतून पीएमपीएमएलच्या वाहतूक नियोजन विभागाकडे "पीएमपीएमएल डिझाईन स्टुडिओ" ही संकल्पना सादर करण्यात आलेली होती. या संकल्पनेअंतर्गत पीएमपीएमएलचे वाहतूक नियोजन अधिकारी (आय.टी.) श्री. विजय रांजणे यांनी ए.एस.आर.टी.यु. यांचेकडे बसमार्गाचे लाईन मॅप, जंक्शन मॅप, बसथांब्यावरील वारंवारितेचे वेळापत्रक, बस कनेक्टिव्हिटी मॅप व बसथांब्यांचे पोलचे मॅप प्रवाशांच्या मार्गदर्शनासाठी मुख्य बसस्थानकांवर लावण्याबाबतची संकल्पना मांडलेली होती.

नवी दिल्ली येथे दिनांक १५ मार्च २०२४ रोजी पार पडलेल्या ए.एस.आर.टी.यु. च्या ६४ व्या वार्षिक परिषदेमध्ये ए.एस.आर.टी.यु. चे अध्यक्ष तथा भारत सरकारच्या रस्ते परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाचे सचिव मा. श्री. अनुराग जैन, ए.एस.आर.टी.यु. चे उपाध्यक्ष मा. श्री. राव यांच्या हस्ते व ए.एस.आर.टी.यु. चे संचालक मा. श्री. टी. सूर्याकिरण यांचे प्रमुख उपस्थितीत "पीएमपीएमएल डिझाईन स्टुडिओ" या नाविन्यपूर्ण संकल्पनेसाठी पुरस्कार स्वरूप दिले जाणारे मानचिन्ह पुणे महानगर परिवहन महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक मा. श्री. नितीन नार्वेकर व मुख्य वाहतूक व्यवस्थापक (संचलन) मा. श्री. सतिश गव्हाणे यांनी स्वीकारले.

Sd/-
**मुख्य वाहतूक व्यवस्थापक (संचलन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि.१८/०३/२०२४

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा.स.कळावे.

Sd/-
**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---